॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

'A' Grade NAAC Re-accredited (4th Cycle)

# कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ,जळगाव

Kavayitri Bahinabai Chaudhari North Maharashtra University, Jalgaon

## जनसंपर्क विभाग

जळगाव १, (प्रतिनिधी) : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाच्या राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीच्या बैठकीत राष्ट्रीय स्तरावरील पश्चिम विभागीय पथसंचलन शिबिर आयोजित करणे व प्रत्येक महाविद्यालयात कुलपती घनवन योजना मियावाकी उपक्रम राबविणे बाबत निर्णय घेण्यात आले.

कुलगुरू प्रा.व्ही.एल. माहेश्वरी यांच्या अध्यक्षतेखाली मंगळवार दि. १ ऑक्टोबर रोजी विद्यापीठ राष्ट्रीय सेवा योजना सल्लागार समितीच्या बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत कुलगुरू प्रा.व्ही.एल माहेश्वरी यांनी रा.से.यो. मधून अडीच लाखांपेक्षा अधिक विद्यार्थी प्रशिक्षीत झाले आहेत. रा.से.यो. मुळे विद्यार्थी विद्यार्थ्यांना शिस्त, सामाजिक जबाबदारीचे भान, नेतृत्व, आपत्कालीन कौशल्य असे अनेक गुण जोपासता येतात. नव्या शैक्षणिक धोरणामध्ये रा.से.यो. करीता श्रेयांक विद्यार्थ्यांना प्राप्त होण्याची तरतूद करण्यात आली आहे असे सांगितले. रा.से.यो. विभागाने गतवर्षात राबविलेल्या महाविद्यालयातील एककांच्या उपक्रमांची माहिती रा.से.यो. संचालक डॉ. सचिन नांद्रे यांनी मांडली. या बैठकीत अध्यादेश १६३ अंतर्गत स्वयंसेवकांना देण्यात येणाऱ्या गुणदानांचे प्रस्ताव ऑनलाईन स्वरूपात मागविण्याबाबत चर्चा करून निर्णय घेण्यात आला. रा.से.यो. विभागीय संचालक अजय जी. शिंदे यांनी ऑनलाईन पध्दतीने बैठकीत राष्ट्रीय स्तरावरील पश्चिम विभागीय पथसंचलन शिबिर विद्यापीठात आयोजित करण्याबाबत विद्यापीठास विनंती केली ती कुलगुरूंसह सर्वांनी मान्य केली. नोव्हेंबरच्या दुसऱ्या आठवड्यात देशातील गोवा, दादरा नगर हवेली, गुजरात, आंध्रप्रदेश, तेलंगाणा, दिव -दमण व महाराष्ट्र या दहा राज्यातून २१० रा.से.यो. स्वयंसेवक व त्यासोबत कार्यक्रम अधिकारी विद्यापीठात पथसंचलन शिबिराकरीता उपस्थित राहणार आहेत. या बैठकीत कुलपती घनवन योजना मियावाकी उपक्रम राबविणे बाबत महाविद्यालयांनी प्रस्ताव पाठवावेत. या प्रस्तावांना विद्यापीठाकडून अनुदान दिले जाणार असून पर्यावरण संवर्धनासाठी विद्यापीठाने हा पुढाकार घेतला आहे. या बैठकीत अंदाज पत्रकाच्या विषयासह रा.से.यो. महाविद्यालयीन १०२ एककांना मान्यता देण्यात आली. स्वच्छता ही सेवा या पंधरवडा निमित्त उपस्थित सर्व समिती सदस्यांना कुलगुरूंनी शपथ दिली.

या बैठकीत प्र-कुलगुरू प्रा. एस.टी. इंगळे, कुलसचिव डॉ. विनोद पाटील, वित्त व लेखाधिकारी सीए रविंद्र पाटील, रा.से.यो. प्रशिक्षण केंद्र, अहमदनगर येथील समन्वयक डॉ.जी.एस. गायकवाड यांच्यासह प्राचार्य एस.ए. महाजन, प्राचार्य एस.के. शेलार, प्राचार्य राजू फालक, प्राचार्य जयश्री गावीत, प्राचार्य राजेंद्र वाघुळदे, प्राचार्य राजेंद्र अहिरे यांच्यासह विविध कार्यक्रम अधिकारी, विद्यार्थी समिती सदस्य म्हणून उपस्थित होते.

........................................................................................................................................

जा.क्र.:-कबचौउमवि/१६/ई-मेल/बातमी/२०२४ दिनांक: १ ऑक्टोबर, २०२४

प्रति,

मा.संपादक/प्रतिनिधी,

महोदय,

वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात प्रसिध्द करावी, ही विनंती.

आपला विश्वासू

(डॉ.सुनील पाटील)
जनसंपर्क अधिकारी